# भारताचा



# राष्ट्रध्वज

## आणि

## अन्य राष्ट्रीय प्रतीकें

MR
028.5
B 288 B

MR
028.5
B 288 B

बा. स. बर्वे,
शिक्षक,
कुडचडें. गोवा.

INDIAN INSTITUTE OF
ADVANCED STUDY
SIMLA

Shri N. B. Marathe Librarian Simla - 5 from Author B. S. Barve 14/1/1968

# भारताचा राष्ट्रध्वज

आणि

# अन्य राष्ट्रीय प्रतीकें


लेखक

**बा. स. बर्वे,**

शिक्षक, कुडचडें—गोवा.


**मूल्य ६५ पैसे.**

प्रकाशक :-
बा. स. बर्वे,
कुडचडें-गोवा.

MR
028.5
B288

प्रथमावृत्ति एप्रिल १९६५
प्रति २५००
सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

INDIAN INSTITUTE OF ADVANCED STUDY
Acc. No. 22723
Date 30.1.68
SIMLA

मुद्रक :-
टी. ए. कुलकर्णी,
बी. एस्सी. (ऑनर्स.)., बी. एड्.,
७९, टिळकवाडी, बेळगांव.

Library IIAS, Shimla
MR 028.5 B 288 B
00022723

# प्रास्ताविक

राष्ट्रध्वज, राष्ट्रचिन्ह व राष्ट्रगीत हीं प्रत्येक स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्राचीं मानचिन्हें म्हणून समजलीं जातात. राष्ट्राच्या अस्मितेचीं तीं प्रतीकें होत. प्रत्येक राष्ट्र आपल्या या मान–चिन्हांच्या प्रतिष्ठेसाठीं जपत असतें. ब्रिटनसारखीं जीं जुनी राष्ट्रें आहेत तिथें या मानचिन्हांना ऐतिहासिक परंपरेनें एक प्रतिष्ठा प्राप्त झालेली असते. युनियन जॅक फडकता ठेवण्यासाठीं ब्रिटीश जवानांनीं किती तरी लढाया दिल्या आहेत आणि स्वतःच्या प्राणांची आहुति दिली आहे. इतिहासांत या गोष्टी वाचल्या म्हणजे ब्रिटीश किशोरांना नी कुमारांना युनियन जॅकची थोरवी प्रतीत होते आणि आपल्या देशाच्या या मानचिन्हासाठीं आपणही प्रसंग पडल्यास प्राणार्पण केलें पाहिजे ही शिकवण मिळते. जी गोष्ट राष्ट्रध्वजाची तीच राष्ट्रगीताची. " गॉड सेव्ह दि किंग ( किंवा क्विन ) " ह्या ब्रिटनच्या राष्ट्रगीताचे स्वर कानावर पडतांच, असा एकही ब्रिटिश जगांत नसेल, कीं जो ताडकन् उठून उभा राहाणार नाहीं.

वास्तविक आदरणीय व्यक्ति वा प्रतीकाविषयीं आदर व्यक्त करण्यासाठीं उठून उभे राहावें ही पौर्वात्य प्रथा, वडिल माणसांसमोर बसणें हें आपल्या भारतीय समाजांत परवांपर्यन्त असभ्य समजलें जाई. पण आईबापांपेक्षांही श्रेष्ठ जी मातृभूमि तिच्याविषयीं आदर व्यक्त करण्याचा राष्ट्रगीत गायनाचा प्रसंग आला तर आपण त्या ब्रिटिशांप्रमाणें वर्तन करतों का ? सिनेमां–

तून शेवटीं राष्ट्रगीत वाजविण्याची कुठेंकुठें प्रथा आहे. त्या-ठिकाणीं काय अनुभव येतो ? एक मिनिटभर शांत, स्तब्ध राहून राष्ट्राविषयीं आदर व्यक्त करणें आपल्याला कठीण आहे का ? एकादें मिनिट सिनेमागृहाबाहेर पडायला उशीर झाला तर आकाश कोसळून पडेल का ? पण या गोष्टीचा कुणीं विचा-रच करीत नाहीं.

दोन कारणासाठीं आपल्या देशांत ही अनवस्था माजली आहे असें मला वाटतें. आपला भारत देश फार प्राचीन असला तरी भारत राष्ट्र हें अर्वाचीन आहे. आपल्या या विशाल देशांत महाभारतकालापासून अनेक राष्ट्रकें नांदलीं, अनेक राजवंश झाले, त्यांतलाच वेळोवेळीं एकादा राजा सम्राट पदाला चढला. या राष्ट्रकांच्या व राजवंशांच्या अस्तित्वामुळें एकराष्ट्रीयत्वाची भावना आपल्या देशांत निर्माण झाली नाहीं. मध्ययुगीन काळांत तर परकीयांच्या आक्रमणामुळें व त्यांनी भारत आपलें निवास-स्थान केल्यामुळें आपलें एकवंशीयत्वही नाहींसें झालें. देशाचे तुकडे पडले. ब्रिटिश राजवटींत ही सांधेजोड होत होत १५ ऑगस्ट १९४७ या दिवशीं राष्ट्र या पदवीला आपण येऊन पोंचलों. राष्ट्राविषयीं जो अभिमान, नागरिकांत निर्माण व्हायला हवा तो होण्याइतका स्वातंत्र्याचा काळ अजून मागें पडलेला नाहीं.

दुसरें कारण म्हणजे आपल्या देशांतील निरक्षरता आणि अज्ञान. राष्ट्रांतील सारे नागरिक सज्ञान असते तर राष्ट्राच्या प्रतीकांचा व मानचिन्हांचा अर्थ कुणी समजावून सांगितल्या-शिवायच त्यांना तो कळला असता. पण निरक्षरांची बहुसंख्या

असलेल्या देशांत राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, राष्ट्रचिन्ह म्हणजे काय हें समजावून सांगावें लागतें. त्यांचा आदर करा हें पटवून द्यावें लागतें.

हेंच काम माझे स्नेही श्री. बा. स. बर्वे यांनीं या छोटेखानी पुस्तकांत केलें आहे. ज्यांच्या ज्यांच्या वाचनांत हें पुस्तक येईल त्यांना या गोष्टी सुलभपणें कळणार आहेत. सर्वसामान्य प्रौढ नागरिकांना तर हें पुस्तक उपयोगी आहेच, परंतु मुख्यतः या पुस्तकाचा खरा उपयोग प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना होणार आहे. यापुढें विद्यार्थ्यांचीं संचलनें, मेळावे वगैरे प्रकार गोमंतकांत होणार आहेत. या मेळाव्यांतून राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज यांचा जो वापर होतो त्याविषयीं शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना जुजबी सूचना दिल्या जातात. पण या संकेतामागची भूमिका काय, त्यांचा इतिहास काय, याची माहिती या पुस्तकानें विद्यार्थ्यांना होणार आहे. या पुस्तकानें विद्यार्थ्यांच्या मनांत राष्ट्रभक्तीचें व राष्ट्रीय अनुशासनाचें बीज पेरलें जाणार आहे, तें अंकुरित होऊन राष्ट्रभक्तीनें रसरसलेली नवी पिढी निर्माण होईल अशी मला आशा वाटते.

पणजी–गोवा, **बा. द. सातोस्कर.**

१–२–१९६५.

# लेखकाचें पान

" भारताचा राष्ट्रध्वज आणि अन्य राष्ट्रीय प्रतीकें " हें पुस्तक प्रौढांस उपयोगी आहेच पण विद्यार्थी मित्रांना त्याचा विशेष उपयोग व्हावा अशी इच्छा आहे.

" राष्ट्रध्वज " विषयक तिन्ही लेख गोमंतकांतील प्रसिद्ध दैनिक " गोमंतक " मध्यें पूर्वीच प्रसिद्ध झाले आहेत. तेच संग्रहित करून पुनर्मुद्रित केले आहेत. म्हणूनच त्यांतील अनावश्यक उल्लेख गाळलेले नाहींत. अन्य लेख स्वतंत्रपणें नंतर लिहिलेले आहेत.

विद्यार्थी दशेंत असतांना घरीं कुटुंबीय मंडळी आणि शाळेंत शिक्षक वर्ग यांचे तोंडून गांधीजी, टिळक, नेहरू, सावरकर व अशींच दुसरीं नांवें कानीं पडत. काँग्रेस, स्वातंत्र्य, तिरंगा, सत्याग्रह वगैरे चर्चाहि कानीं पडे, पण बालबुद्धीला तें आकलन होत नसे. तरी पण " तिरंगा " हा हिंदी राष्ट्रध्वज आहे आणि तीं नांवें वंदनीय आहेत एवढी कल्पना आली. त्यांवर श्रद्धा बसली.

त्याच कालांत १९३० सालीं " तिरंगा " फडकवून एक सभा चालली होती. जिज्ञासेने विद्यार्थी मित्रांसह मीहि तेथें थबकलों होतों. एवढयांत पोलीस आले. धरपकड झाली, " तिरंगा " अत्यंत सन्मानपूर्वक खालीं उतरविला गेला पण त्याचा अनादर झाला नाहीं. या कृतीचा मजवर खोल परिणाम झाला. तिरंगा ही काहींतरी " विशेष " वस्तु असल्याची जाणीव झाली. त्यावरील श्रद्धा वाढली. त्याच रात्रीं मातामह

कै. द. ना. अभ्यंकर पोस्ट मास्तर, चिपळूण यांनीं तिरंग्याची कथा सांगून माझी जिज्ञासापूर्ति केली. वरील घटना चिपळूण येथील आहे हें ओघानें आलेंच.

गेल्या महायुद्धांत हिंदी लष्करांत १९४२ सालीं बर्मा आघाडीवर असतांना इंग्रजांचा सहवास सदैव होताच. शिवाय अमेरिकन, स्पॅनिश, इटालियन सैनिकांशीं थोडा काळ सहवास घडला. त्यांच्याशीं जी चर्चा होई त्यांतून, त्यांचे प्रखर देशप्रेम व निष्ठा यांचा बोध झाला. स्वराष्ट्रीय ध्वज व गीत यांच्या प्रतिष्ठेसाठीं ते सदैव दक्ष. ते उत्साहानें स्वराष्ट्रगीत गाऊन दाखवत. स्वराष्ट्रीय उत्पादन सर्वोत्तम ही त्यांची भावना. आपल्या राष्ट्रीय प्रतीकांबाबत त्यांचे खोल ज्ञान, स्वातंत्र्य रक्षणाची तळमळ वगैरे गोष्टी कळून आश्चर्य वाटे. तुलनेनें स्वतःचें क्षुद्रत्व पटून मनोमन खंत वाटे.

हिंदी सैन्याला "भाडोत्री सैनिक" संबोधल्याबद्दल संतापून, हिंदी डॉक्टर असलेल्या एका लेफ्ट. कर्नल साहेबांनीं, युनियन जॅक चे जागीं "भारताचा तिरंगा" कल्पून त्याला प्रणाम करीत जा, भारताचें स्वातंत्र्य आतां दूर नाहीं असा "कानमंत्र" संधि पाहून दिला. त्यांच्या खासगी चर्चेत नेहमी भारताचा स्वातंत्र्य विषय असे. त्यावेळीं भारतांत "आझाद हिंद सेनेचा" प्रवेश झाला होता. त्यांच्या सहवासानें "तिरंग्या" वरील श्रद्धा वृद्धिंगत होत गेली.

पुढें १९४६ मध्यें लष्करांतून निवृत्त होऊन गोमंतकांत शिक्षकी पेशा पत्करला व पुढील वर्षी भारत स्वतंत्र झाला. ऑगस्ट १५ हा भारताचा स्वातंत्र्य दिन. याच दिवशीं गोव्यांतहि

पोर्तुगीज ध्वजवंदन होई. हें स्थान भारतीय ध्वजाचें आहे, लवकरच तो हक्कानें व मानानें या भूमिवर फडकेल ही खात्री होतीच. तो योग १९ डिसेंबर १९६१ या दिवशीं आला. भारतीय " तिरंग्याचें " अपूर्व स्वागत झालें. गोमंतकीय जनतेला धन्यता वाटली. कित्येक दिवसपर्यंत हा आनंद सभा व मिरवणुकांद्वारें व्यक्त होत होता.

पण भारतीय ध्वजारोहण प्रसंगीं कांही ठिकाणीं, अनादर भावना व औदासीन्य अनुभवास आलें, वृत्तपत्रांतूनहि अशा बातम्या वाचनांत येत. या प्रवृत्तीबद्दल खेद वाटला आणि याच भावनेंतून " राष्ट्रध्वज " विषयक लेख निर्माण झाले. "गोमंतक" चे संपादक श्री. सातोस्कर यांनी ते प्रसिद्ध करुन मला आभारांत ठेवलें.

प्रसिद्ध झालेले लेख पुष्कळांस आवडले व ते पुस्तकरुपानें प्रसिद्ध व्हावेत असा मित्रांचा सल्ला मिळाला म्हणून श्री. सातोस्कर व श्री. जयवंतराव सरदेसाई यांचे मत घेतलें असतां, त्यांनी आपापला अनुकूल अभिप्राय पत्रद्वारें दिला. तसेंच एका अधिकारी शिक्षण तज्ञानींहि पाठिंबा दिला. त्यामुळेंच हें पुस्तक प्रकाशनाचें धाडस करीत आहें. या तिघांचा मी अत्यंत ऋणी आहे.

पुस्तकांतील विषय हा आपला राष्ट्रीय अभिमान असून ही माहिती शालेय मुलांना सतत मिळत गेल्यास त्यांच्यांत राष्ट्रीय ऐक्य व बंधुभाव दृढ होईल. तीं शिस्तप्रिय नागरिक बनतील असा विश्वास वाटतो.

शालेय मुलें प्रसंगीं पालकांपेक्षां आपल्या शिक्षकांवर जास्त विश्वासून राहतात असा माझा अनुभव आहे. म्हणूनच शालेय अभ्यासक्रमांत या विषयाला आठवड्यांतून एकादा तास

( Period ) मिळाल्यास भावी पिढी प्रखर राष्ट्राभिमानी निपजेल व पुष्कळसें कार्य होईल अशी श्रद्धा आहे.

आपल्या गोवा शिक्षण खात्यानें शाळांच्या दैनंदिन अभ्यासाचा आरंभ "राष्ट्रगीत गायनानें" व्हावा असा आदेश दिला आहे ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. वरील हेतुसाठीं, केवळ सदिच्छेनें फलप्राप्ति होईल असा विश्वास न धरतां, अधिकाऱ्यांच्या आदेशाची आवश्यकता भासते.

आतां ऋणनिर्देश. वर तिघांचा उल्लेख आहेच. तरीपण श्री. सातोस्करांनी अनारोग्य असतांही सवड काढून प्रास्ताविक लिहून पाठविलें म्हणून त्यांचे पुन्हा आभार मानणें हें मला कर्तव्य वाटतें. शिवाय मला आपणांकडील माहिती पुरवून ज्यांनी सहकार्य दिलें त्यांचाही आभारी आहें.

डॉ. त्रिंबक बळवंत नाबर असि. सुपरिटेंडेंट (झू) राणीबाग, मुंबई यांनी मोराचें आयुर्मान कळवून मला ऋणी करून ठेवलें आहे.

श्री. स. ना. बर्वे बिठ्ठोण, यांनी सस्नेह सक्रीय पाठिंबा देवून ऋणी केलें आहे. बेळगांवच्या नूतन प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री. कुलकर्णी व त्यांचे कर्मचारी यांनीं तत्परतेनें छपाई सुबकपणें करून मला आभारांत ठेवलेंच आहे.

माझे व्यवसाय बंधु, शिक्षणप्रेमी जन आणि विद्यार्थी मित्र यांनी या पुस्तकाला उदार आश्रय द्यावा अशी विनंती आहे.

या पुस्तकाच्या द्वितियावृत्तिचा योग येईल त्यावेळीं त्यांत भारताची "राष्ट्रभाषा हिंदी" "राष्ट्रफूल कमल" व

राष्ट्रीय पशु हत्ती " या माहितीची भर घालावी असें मानस आहे.

पुस्तकांत कांहीं उणीवा राहिल्या असून मला त्याची जाणीव आहे. द्वितियावृतींत ते दोष दूर करीन आणि कोणी कांहीं सूचना केल्यास त्यांचा साभार स्वीकार करीन. अनावश्यक उल्लेखही गळतील.

माझी ही पहिलीच अल्प कृति सर्वांस आवडो आणि शेवटीं.......

विजयी विश्व तिरंगा प्यारा। झंडा ऊंचा रहे हमारा ॥
ही श्रद्धा दृढ राहो अशी श्री चरणीं प्रार्थना आहे.

कुडचडें–गोवा
२ एप्रील १९६५

**बा. स. बर्वे.**

# भारताचा राष्ट्रध्वज

राजकीय शासन दृष्टचा गोमंतक, दीव व दमण हे भारतांतील भूभाग पोर्तुगालच्या मगरमिठींतून भारत संघराज्यानें मुक्त केले आणि भारताचें स्वातंत्र्य पूर्णत्व पावलें, त्याचक्षणीं भारतीय राष्ट्रध्वज दिमाखाने या प्रदेशांवर फडकूं लागला व येथील जनतेला आपण स्वतंत्र झाल्याची पूर्ण खात्री पटली. तसेंच स्वातंत्र्याची ग्वाही या तिरंगी राष्ट्रध्वजामार्फत येथील जनतेला मिळाली.

फार पूर्वीं आजच्या प्रमाणेंच आपला भारत देश स्वतंत्र होता. त्याकाळीं देशांत स्वतंत्र राष्ट्रांचे विजयध्वज डौलाने फडकत असले पाहिजेत. श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण व पांडव यांचे ध्वज उदाहरणार्थ देतां येतील. मराठ्यांचा भगवा झेंडा तर येथील परकी इस्लामी सत्ता नष्ट करण्याच्या इराद्यानें अटकेपार फडकत होता. परंतु मराठी सत्ता नष्ट करून इंग्रजी शासन भारतांत सुरू झालें आणि ब्रिटिशांचा 'युनियन जॅक' भारतीय भूमिवर फडकूं लागला व त्याचबरोबर भारतीय जनतेला गुलमगिरीची-स्वातंत्र्य नष्ट झाल्याची जाणीव तीव्रतेनें होऊं लागली. मनांतल्या मनांत स्वातंत्र्याची भावी आशा बाळगून भारतीय देशभक्त तसेंच

स्वातंत्र्यांत वाढलेले शूर सैनिक, इंग्रजांबरोबर 'युनियन जॅकला' नाखुषीनें मुजरा करण्याची बतावणी करीत पण ते खरोखर अंतर्यामी 'युनियन जॅक' चा द्वेष करीत.

इंग्रजांच्या इंग्रजी निशाणाप्रमाणेंच फ्रेंच मुलुखांत फ्रेंच निशाण व पोर्तुगीज मुलुखांत पोर्तुगीज निशाण, त्या त्या भागांतील जनतेला गुलामगिरीची जाणीव देत होतेंच.

भारताला स्वतंत्र्य मिळवून देण्यासाठीं 'राष्ट्रीय सभा' किंवां ***Indian Congress*** जन्माला आली; पण इंग्रजी कारभारांतील किरकोळ सुधारणांच्या मागण्यांपलिकडे त्यावेळच्या सभेच्या पुढाऱ्यांच्या आकांक्षा नव्हत्या. इतकेंच नव्हे तर १९२० सालापर्यंत सभेच्या मंडपावर हा परकी 'युनियन जॅक'च फडकत असे.

राष्ट्रीयसभेनें स्वराज्याची घोषणा केल्यावर मात्र स्वराज्याबरोबरच स्वतंत्र राष्ट्रध्वज पाहिजे ही कल्पना पुढाऱ्यांच्या मनांत मूळ धरूं लागली. परकी इंग्रजी सत्तेविषयींच्या असंतोषाबरोबरच स्वतंत्रता व स्वतंत्र निशाण यांची तीव्रतेनें येथील जनतेला आवश्यकता भासूं लागली होती.

## राष्ट्रध्वजाची पहिली कल्पना

इंग्लंडांत असलेले कांहीं क्रांतिकारक तरुण स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज कसा असावा याची गरम गरम चर्चा,

'इंडिया हाऊस' मधें रात्रौ एकत्र जमून करीत. कारण त्यांना पाश्चात्य जनता स्वतंत्र भारताचा हिंदी राष्ट्रध्वज कसा आहे? असा सवाल करीत आणि या तरुणांना उत्तराऐवजीं लाजेनें माना खालीं घालाव्या लागत व फार दुःख होई.

त्याचवेळीं जर्मनींत आंतरराष्ट्रीय समाजवाद्यांचें एक संमेलन भरावयाचें होतें आणि प्रत्येकानें आपल्या राष्ट्राचें प्रतीक म्हणून आपलें निशाण आणावें असें सर्वांना कळविण्यांत आलें होतें या संधीचा फायदा घेऊन इंग्लंडांत राहणाऱ्या भारतीय क्रांतिकारकांनीं आपल्या कल्पनेप्रमाणें एक भारतीय राष्ट्रध्वज बनविला. या ध्वजाची वरची पट्टी भगवी, मधली पांढरी व खालची पट्टी हिरवी होती. भगव्या पट्टीवर त्यावेळच्या भारतांतील आठ भाषावार प्रांतांचीं प्रतिकें म्हणून आठ कमलपुष्पें होतीं, शुभ्र पट्टीवर 'वंदे मातरम्' हा राष्ट्रमंत्र होता आणि हिरव्या पट्टीवर सूर्य–चंद्र होते. अमेरिकेच्या ध्वजावर संयुक्त संस्थानांचें प्रतीक म्हणून तारे दाखविलेले आहेत, त्यावरून आठ कमल पुष्पांची कल्पना घेतली होती. श्री. हेमचंद्रदास या बंगाली क्रांतिकारकांनी रातोरात हा ध्वज जागून व्यवस्थित शिवून तयार केला आणि फ्रान्समधील क्रांतिकारकांत सामील झालेल्या श्री. 'मादाम कामा' या भारतीय पारशी विदुषीनें हा राष्ट्रध्वज पोलक्यांत लपवून या जर्मनींत

भरणाऱ्या संमेलनांत नेला. योग्य वेळ येतांच तिनें बर्लिन-मधील प्रचंड जनसमुदायासमोर भाषण करून 'वंदे मातरम्' च्या घोषणेंत हा भारतीय स्वतंत्र राष्ट्रध्वज फडकावला. त्यावेळीं ती म्हणाली, 'स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज आतांच जन्माला येत आहे. त्याला वंदन करा' त्याबरोबर जर्मन जनतेने या ध्वजाला मानवंदना दिली आणि राष्ट्रीय जर्मन बँड पथकानें पण सलामी दिली. अशाप्रकारें १९०६ सालीं भारतावर राज्य करणाऱ्या इंग्रजांच्या घरांतच हा ध्वज तयार झाला. तेथून तो भारतीय महिलेनें फ्रान्समधून जर्मनींत नेऊन फडकावला आणि इंग्रजांना भारतीय पुढारी व जनता यांची धास्ती वाटूं लागली.

परदेशांत वास्तव्य करणाऱ्या भारतीय क्रांतिकारकांनीं हा ध्वज जगजाहीर केला खरा, परंतु भारतांत 'वंदे मातरम्' ची घोषणा किंवा स्वराज्याचा उच्चार करणें हा राजद्रोह ठरत होता. म्हणून भारतीय पुढाऱ्यांनीं या ध्वजाबद्दल औदासिन्य दाखविलें. जर कोणी उत्सुकता दाखविता तर त्याला कठोर इंग्रजी शासनानें स्वातंत्र्यवीर सावरकरांप्रमाणें जन्मठेपीची शिक्षा भोगण्यास अंदमान बेटांत पाठविण्यास कमी केलेंच नसतें. अर्थात या ध्वजाचा प्रसार भारतांत झाला नाहीं व हा १ ला प्रयत्न फसला.

## दुसरा प्रयत्न

इंडियन होमरुलच्या १९१६ सालच्या चळवळींत पुन्हा राष्ट्रध्वज बनविण्याचा प्रयत्न झाला. या ध्वजांत तांबड्या व हिरव्या रंगांच्या ९ पट्ट्या सम-विषम पद्धतीनें बसविल्या होत्या. यांतील वरील ५ पट्ट्यांवर सप्तर्षीदर्शक ७ तारे आणि खालील ४ पट्ट्यांवर डाव्या बाजूस ब्रिटिशांचें 'युनियन जॅक' निशाण व उजव्या बाजूस चंद्रकोर व एक तारा दाखविलेला होता. या ९ पट्ट्या म्हणजे भारताचे ९ राजकीय विभाग होते. त्यावेळच्या इतर चळवळींत या ध्वजाचा विचार व प्रचार कोणाला फारसा रुचला नाहीं. फक्त श्री. लोकमान्य टिळक यांनीं या ध्वजाची प्रशंसा केली होती. पण त्यावरील ब्रिटिशांच्या 'युनियन जॅक' या ध्वजाला आपला तीव्र विरोध दर्शविला. अशा प्रकारें राष्ट्रध्वजाचा हा दुसरा प्रयत्न झाला.

## तिसरा प्रयत्न

भारतांत १९२१ सालीं असहकार आंदोलनाची मोठी लाट उसळली होती. ब्रिटिश प्राप्त पदव्यांचा त्याग, शाळा महाविद्यालयांवर बहिष्कार, विदेशी मालावर बहिष्कार असें या चळवळीचें स्वरूप होतें. त्यांतच १९२१ सालच्या 'मार्च' मध्यें 'अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटी' ची बैठक 'बेझवाडा' येथें भरली आणि पुढऱ्यांनीं महात्मा

गांधींजीकडे राष्ट्रध्वजाची आग्रहाची मागणी केली. देशांत खादीची चळवळ जोरांत चालू होती. 'चरखा' भारताचा पोषणकर्ता म्हणून राष्ट्रध्वजावर चरखा बसवून महात्मा गांधींजींनी 'राष्ट्रध्वज' तयार करण्यास संमति दिली. हा ध्वज तिरंगी होता. वर पांढरी पट्टी, मध्यें हिरवी आणि खालीं लाल रंगी पट्टी होती आणि या सर्व पट्टयांवर मधोमध चरखा विराजमान झाला होता. अहमदाबाद येथें 'राष्ट्रीय सभेच्या-मंडपावर हा ध्वज प्रथम फडकला आणि तेव्हांपासून या ध्वजाला राष्ट्रीय कार्यक्रमांत प्रवेश मिळाला. त्याचवेळेपासून भारतीय जनतेला स्वतःच्या स्वतंत्र ध्वजाची कल्पना आली आणि या स्वतंत्र ध्वजाची आसक्ति निर्माण झाली व वाढूं लागली.

## राष्ट्रध्वजाच्या सुधारणेचे निरनिराळे प्रयत्न

हिंदी स्वातंत्र्य चळवळीला चढत चाललेला वाढता जोर व जनतेनें राष्ट्रीय सभेकडे संपविलेलें नेतृत्व यामुळें या ध्वजाच्या प्रकरणीं, कॉंग्रेस वर्किंग कमिटीला लक्ष घालणें प्राप्त झालें. म्हणून सर्वमान्य असा राष्ट्रध्वज तयार करण्यासाठीं कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें सात सभासदांची ध्वजकमिटी नियुक्त केली. या ध्वज कमिटीनें अनेक राष्ट्रीय पुढारी व कॉंग्रेसच्या प्रांतिक कमिट्या यांच्या सल्ल्यानें पूर्ण केशरी रंगाचा ध्वज तयार केला. याच्यावरील

डाव्या कोपऱ्यांत 'चरखा' दाखविला होता. पण हा ध्वज काँग्रेस वर्किंग कमिटीलाच नापसंत होता.

नंतर स्वतः वर्कींग कमिटीनें पूर्वीच्या तिरंगी ध्वजाँत बदल करून क्रमानें वरून खालीं केशरी, पांढरा व हिरवा रंगयुक्त ध्वज तयार करविला. या ध्वजाच्या मधल्या पांढऱ्या पट्टीवर 'नीलवर्ण' चरखा कायम केला. लवकरच मुंबई येथें १९३१ च्या ८ ऑगस्टच्या बैठकींत ठराव पास करून या ध्वजाला मान्यता मिळवून घेतली. त्यावेळेपासून भारताला १५ ऑगस्ट १५४७ रोजीं स्वातंत्र्य प्राप्त होई-पर्यंत हाज ध्वज वापरांत येत असे.

## स्वातंत्र्योत्तर हिंदी राष्ट्रध्वज

दुसऱ्या महायुद्धांत दोस्त राष्ट्रांनीं विजय मिळविला. त्या दोस्तांपैकीं इंग्लंड हा देश विजयी होऊनही जागतिक नेतृत्वांत पराभूत झाला. ऐन महायुद्धांत म. गांधीजींनीं १९४२ त सुरू केलेली 'चले जाव' चळवळ जगप्रसिद्ध झाली. हिंदी जनता यापुढें गुलामगिरींत राहणें शक्य नाहीं हें इंग्रजांना पूर्ण कळून चुकलें. साम्राज्यवादी श्री. चर्चिल इंग्लंडच्या निवडणुकींत अपयशी ठरले व मजूरपक्षाचे पुढारी श्री. क्लेमेंट ॲटली हे इंग्लंडचे पंतप्रधान बनले व लगेच त्यांनी भारतीय स्वातंत्र्याची घोषणा केली. सर्वत्र आनंदी आनंद झाला आणि १५ ऑगस्ट १९४७ या दिवशीं

इंग्रजांची शासनसत्ता भारतांतून नष्ट होऊन हा आपला देश पूर्ण स्वतंत्र व सार्वभौम झाला. याच दिवशीं 'दिल्ली' ला भारताच्या राजधानींत इंग्रजांचे शेवटचे व्हॉइसरॉय लॉर्ड माऊंटबॅटन यांनी स्वहस्तें भारतीय तिरंगी ध्वज या भूमिवर फडकावला आणि भारताचें स्वातंत्र्य जाहीर केलें.

ज्या इंग्रजी सत्तेने भारतीय जनतेला १५० वर्षें गुलामगिरींत ठेवण्याचा अट्टाहास केला भारतीय स्वातंत्र्य मागणाऱ्या पुढाऱ्यांना कैदेंत टाकलें, जनतेचे हालहाल केलें, त्याच सत्तेच्या प्रतिनिधीनें स्वतःच्या हातांनी भारतीय ध्वज फडकावला हा भारतीय जनतेचा केवढा विजय! भारताच्या बाबतींत घडलेला हाच पहिला ऐतिहासिक प्रसंग होय.

स्वतंत्र भारताची 'राज्यघटना' ठरविण्यासाठीं जी 'घटनासमिती' नेमली गेली होती तिनें या ध्वजांत थोडा फरक करून चरख्याऐवजीं चक्रवर्ती अशोकाचें 'धर्मचक्र' मान्य केलें आणि मधल्या पांढऱ्या पट्टीवर अशोक चक्र रूढ केलें; तसेंच ध्वजांतील रंगयोजना गुणविशिष्ट केली; आणि ती भारतीय जनतेला सादर केली. भारतांतील सर्व धर्मीय व पंथीय जनतेनें आनंदानें हा ध्वज स्वीकारला.

स्वातंत्र्यदिनीं म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ या दिवशीं या ध्वजाबाबत आपले पंतप्रधान श्री. नेहरू यांनी 'घटना-परिषदे' पुढें जें भाषण केलें तें मनाची पकड घेणारें आहे.

निःपक्षपातीपणानें केलेलें हें श्री. नेहरूंचें भाषण प्रत्येक भारतीयानें शक्यतों मिळवून वाचावें इतकी त्याची थोरवी आहे,

भारतांत सर्वत्र आणि परदेशांत भारतीय वकिलातींच्या कचेऱ्यांवर आपला हा पवित्र ध्वज नेहमींच फडकत असतो. कांहीं विशिष्ट वेळीं-उदाहरणार्थ 'ऑलिंपिक सामने' पण हा ध्वज फडकावतात.

आज स्वतंत्र भारताचा १७ वा स्वातंत्र्यदिन आणि गोमंतकीयांसाठीं दुसरा स्वातंत्र्यदिन आहे. भारतांत, त्याचबरोबवर गोमंतकांतहि ठिकठिकाणीं झेंडावंदनाचे कार्यक्रम थाटामाटानें होतील. शालेय विद्यार्थी मिरवणुका काढतील आणि सर्वत्र उत्साहाचें, स्वातंत्र्याचें वारें संचारलेलें दिसून येईल. आजपर्यंत गोमंतकीयांनीं परकी पोर्तुगीज निशाणाला नाखुशीनें मानवंदना दिली; आणि तें विसरण्याचा प्रत्येकजण प्रयत्न करीत असेल. पण आजचा दिवस हा स्वयंप्रेरणेनें स्वतःच्या ध्वजाला वंदन करण्याचा आहे आणि हें कर्तव्य प्रत्येकजण उमेदीनें पार पाडील यांत शंका नाहीं.

( "गोमंतक" स्वातंत्र्यदिन विशेषांक )


१५–८–१९६३.

# ध्वजारोहण

"भारताचा राष्ट्रध्वज" हा लेख 'गोमन्तकाच्या' १५ ऑगस्ट १९६३ च्या विशेषांकांत वाचल्याचें वाचकांस स्मरत असेलच. राष्ट्रध्वजांतील रंग योजना गुणविशिष्ट केली गेली आहे ही माहिती, राष्ट्रध्वजाच्या इतिहासाबरोबर मी दिली होती. परंतु या गुणविशिष्ट रंगयोजनेमागील हेतु त्यांत व्यक्त केलेला नव्हता. आजच्या 'गोमन्तक' अंकासठीं ध्वजारोहण या लेखांत तो हेतु व वरील मथळ्याप्रमाणें ध्वजारोहण संकेत कसा ठरलेला आहे याची वाचकांस तोंडओळख करून देण्याचा माझा हेतु आहे.

## भारतीय राज्यघटना व घटना समिती

राज्यकारभार कसा चालवावा या संबंधी तरतुदी घटनेंत असतात. प्रत्येक स्वतंत्र राष्ट्रांतील नागरिकांना स्वराष्ट्राची घटना, कारभारयंत्रणेच्या सुव्यवस्थेच्या दृष्टिने तयार करण्याचा अधिकार आहे व हा अधिकार ते घटनासमिती नेमून बजावतात. जनतेचे विश्वासू असे प्रतिनिधी निवडतात. ते एकत्र जमतात व आपल्या देशाची घटना तयार करतात. घटना म्हणजे शासनविषयक नियम–जे सर्वकालीं राज्यकर्त्यांना तसेंच जनतेलाहि उपयुक्त किंवा


बँड पथक
१ निमंत्रित पाहुणे मंडळी
२ पाहुणे मंडळी
३ सरकारी अधिकारी
गमनमार्ग
प्रवेश मार्ग
ध्वजनी
अध्यक्ष
स्त्रिया
स्त्रिया
गायक गण
लहान मुलें
स्त्रिया
सेवा सैनिक

मार्गदर्शक होतील–लिहिलेलें अधिकृत पुस्तक होय. जनतेला किंवा चालू राज्यकर्त्यांना वेळप्रसंगी घटनेंतील कांहीं भाग किंवा कलमें बदलून घेणें किंवा वाढ करणें अथवा रद्द करणें जरूर वाटेल तर त्यासाठीं भारतीय संसदेंत तसा ठराव मांडावा लागतो आणि बहुमतानें व मतदानांत भाग घेणाऱ्या २/३ सभासदांच्या मतानें तसा ठराव पास करून तो राष्ट्रपतिकडे संमतिस्तव पाठवतात. राष्ट्रपतिनीं अनुमति दिली कीं ठरावानुसार बदल झाला असें कायदेशीरपणें जाहीर करण्यांत येतें. घटनेविषयीं आवश्यक ते फेरफार करण्याचा अधिकार फक्त भारतीय संसदेलाच आहेत. संसद ही लोकप्रतिनिधींची व तिच्याच सल्ल्यानें विधेयकद्वारें ही गोष्ट भारतांत शक्य आहे. घटनेचें पावित्र्य प्रतिष्ठा कायम राखण्यासाठीं सामान्य नागरिकापासून राष्ट्रपतिपर्यंत ती सर्वांवर बंधनकारक आहे. असें मान्य करण्यांत आलें आहे. मात्र कांहीं देशांची घटना लिखित अशी नाहीं. उदाहरणार्थ 'इंग्लंड' देश. जगांत सर्वांत प्रथम लिखित घटना अमेरिकन राष्ट्राची घटना आहे.

भारताची राज्यघटना तयार करण्यासाठीं १९४६ डिसेंबरांत समिती स्थापन झाली. २२ जाने. १९४७ ला राज्यघटनेचें ध्येय स्पष्ट करणारा ठराव संमत झाला. २९ ऑगस्ट ४७ रोजीं मसुदा तयार झाला व डॉ. आंबेडकर

यांचे अध्यक्षतेखालीं तो मसुदा १९४८ फेब्रुवारींत प्रसिद्ध झाला. घटनासमितीनें ४ नोव्हेंबर ४८ पासून या मसुद्यावर चर्चा सुरू केली व २६ नोव्हें. ४८ रोजीं संपली. घटनेचा पुष्कळसा भाग २६ नोव्हें. ४९ पासून अमलांत आला व उरलेला २६ जाने. ५० रोजीं पासून अमलांत आला. या घटनासमितीचे अध्यक्ष माजी राष्ट्रपति कै. राजेंद्रप्रसाद हे होते. भारताच्या घटनेंत ३९५ कलमें व ९ परिशिष्टें असून अशी लिखित सविस्तर घटना, जगांत दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्राची तूर्त तरी नाहीं. भारताच्या मान्यवर नेत्यांनीं ती तयार केलेली आहे.

घटनासमितीनें भारतीय राष्ट्रध्वज कसा असावा हें ठरवून दिलेलें आहे. हा ध्वज तिरंगी असून प्रथमची वरची पट्टी केशरी, मधली शुभ्र व खालची हिरवी अशी रंग योजना कायम केली असून शुभ्र पट्टीवर २४ आरेयुक्त नीलवर्णी 'अशोकचक्र' आहे. सारनाथ येथें असलेल्या सिंहाच्या चिन्हावरून हें चक्र घेतलें गेलें. तें गतिमान आहे अशी त्यामागें कल्पना असून तें धर्मचक्र आहे असाहि संकेत मान्य करण्यांत आला आहे. केशरी रंग हा स्वातंत्र्या-साठीं झालेला त्याग, सेवा व बलिदान यांचें प्रतीक आहे. तर पांढरा रंग हा पावित्र्य, सत्यता, बंधुभाव यांचें प्रतीक असून हिरवा रंग हा संकटें सोसण्यासाठीं चिकाटी, धैर्य व शांति आणि हास्य यांचें प्रतीक आहे. अशोकचक्र हें

गतिमान मानलें जातें, धर्मचक्रही मानलें जातें. स्वतः गतिमान रहा, विकसित व्हा, स्वधर्माप्रमाणें वागून दुसऱ्यांसहि त्यांच्या धर्माप्रमाणें वागण्यास मोकळीक द्या असें सुचवितें. एकंदर स्वतःची प्रगति साधतांना इतरांचीहि प्रगति होईल ही धारणा ठेवा असा उपदेश आपला ध्वज आपणांस देत आहे. हा ध्वज घटनासमितीनें जुलै १९४७ रोजीं निश्चित केला आणि १४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्रीं भारतीय महिलांच्या वतीनें तो स्वतंत्र सरकारला अर्पण करण्यांत आला. भारताच्या पारतंत्र्य कालांतहि भारताचें तिरंगी निशाण 'कामा' या पारशी भारतीय विदुषीनेंच प्रथम जर्मनींत बर्लिन येथें फडकविलें होतें. योगायोग कसा येतो तें पहा!

राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा फार घनिष्ठ संबंध आहे. राष्ट्रध्वज जसा प्रत्येक स्वतंत्र राष्ट्राचा ठरलेला असतो तसेंच अशा स्वातंत्र्यप्रेमी जनतेचें स्वतंत्र राष्ट्रगीतहि असतें. प्रत्येक राष्ट्राचें बोधचिन्हहि ठरलेलें असतें आणि तें सरकारी कागदांवर असतेंहि. २४ जानेवारी १९५० रोजीं घटना समितीनें भारताचें राष्ट्रगीत म्हणून "जन मन गण" या गीतास मान्यता दिली. हें गीत प्रथम २७-११-१९११ या दिवशीं कलकत्ता येथें त्याचे कर्ते श्री. गुरुदेव टागोर यांनी काँग्रेस अधिवेशनांत प्रथम म्हटलें. १९१२ जानेवारीच्या 'तत्त्वबोधिनी' पत्रिकेंत तें नंतर

प्रसिद्ध झालें. शीर्षक होतें 'भारत भाग्यविधाता.' या गीतांत एकंदर ५ कडवीं प्रसिद्ध झालीं होतीं. परंतु घटनासमितीनें त्यांतील पहिल्या एकाच कडव्यास 'राष्ट्र-गीत' म्हणून मान्यता दिलेली आहे. याशिवाय बंकिम-चन्द्रांचें 'वन्देमातरम्' गीतहि याच तोलाचें राष्ट्रगीत म्हणून मान्य आहे. कारण याच गीताने भारतीय स्वतंत्र्य-वीरांस प्रथम स्फूर्ति दिली असून अनेक भारतीय सुपुत्र 'वंदेमातरम्‌चा' जयघोष करीत स्वातंत्र्यासाठीं फांसावर हंसतमुखानें चढले आहेत. हें गीत 'आनंदमठ' या बंकिम-चंद्रांच्या कादंबरींत प्रसिद्ध झालेलें असून १८९६ च्या कॉंग्रेस अधिवेशनांत तें गायिलें गेलेलें आहे.

राहिलें बोधचिन्ह. भगवान बुद्धांनीं 'सारनाथ' येथें आपल्या शिष्यांना, मुक्तीचा अष्टविध मार्ग ज्या जागीं प्रथम सांगितला, तेथें अशोकानें स्मारक उभारलें आहे, त्यांतून कांहीं भाग वगळून 'धर्मचक्र' व मुंडकोपनिषदांतील 'सत्यमेव जयते' हें बोधवाक्य (*Emblem*) घेतलें. अशाप्रकारें ९ डिसेंबर १९४६ ते २६ नोव्हेंबर १९४९ इतका अवधि भारतीय राज्यघटना तयार होण्यास लागला आणि अनेक विद्वान व देशभक्त अशा थोर पुरुषांचे कष्ट त्यामागें खर्ची पडलेले आहेत.

आपल्या ध्वजामार्फत स्वतंत्र राष्ट्रीय जनता आशा-आकांक्षा व्यक्त करीत असते. यासाठीं ध्वज हा राष्ट्राचा

पर्यायानें आपलाच असून त्याचा सन्मान करणें म्हणजे एकंदर भारतीय जनतेचाच सन्मान करणें होय. यासाठीं 'ध्वजारोहण' हें कांहीं विशिष्ट प्रसंगीं व विशिष्ट संकेतानीच पार पाडलें जातें. यामागें राष्ट्रीयभावना आणि राष्ट्रहिताची कळकळ हवी आणि या कसोटीस एकंदर भारतीय जनता उतरली आहे म्हणून या भारताला स्वतंत्र ध्वज बनविण्याचा अधिकारहि प्राप्त झाला आहे. भारताला भारतीय भाषांत 'भारत' आणि विदेशी भाषेंत "*India that is Bharat*" असें नामकरण घटनेनें मान्य करून घेतलें आहे. भारत सरकारनें तसा संकेत घालून दिला आहे.

## ध्वजारोहण विधि

प्रत्येक राष्ट्राचें ध्वजारोहण ठरलेल्या दिवशीं परंपरेनुसार, शिस्तींत व शांतपणें होतें. यासाठीं कांहीं संकेत, नियम ठरवून दिलेले असतात. आपला ध्वज हा जणूं आपल्या देशबांधवांचें प्रतीक, इच्छा साफल्याची स्फूर्ति, इतिहासाचें, संस्कृतिचें प्रतीक असतो. या ध्वजाच्या रूपानें आपण आपल्या देशाचा म्हणजेच देशबांधवांचा सन्मान करीत असतों. म्हणून ध्वजारोहण हें शुद्ध व राष्ट्रीय भावनेनें करीत असतात. ज्याला मी या राष्ट्राचा नागरिक आहें असा अभिमान आहे त्याचें तें

निशाण आहे. हा ध्वजारोहण विधि भारतांत अधिकृत असा करण्याचे दोन दिवस आहेत. एक १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्यप्राप्तिदिन आणि २६ जानेवारी हा दुसरा दिवस होय. या दिनीं भारताच्या लिखित घटनेनुसार भारतीय जनतेला लोकशाही स्वरुपाचे धर्मजातिपंथ निरपेक्ष असे समान भूमिकेचे हक्क मिळून तशा शासनयंत्रणेला याच दिवशीं आरंभ झाला म्हणून हा दिवस 'गणतंत्रदिन' म्हणून पाळण्यांत येतो. भारतीय ध्वजारोहण कसें होतें तें पाहूं.

सोबत दिलेल्या आकृतिवरून ध्वजारोहण पद्धति व झेंडा चौक यांची नीट कल्पना येईल. ध्वजारोहणाचेवेळीं सोबतच्या आकृतींत दर्शविल्याप्रमाणें प्रवेशमार्गानें सर्व मंडळी नियत जागीं येतात व बैठकांवर बसतात. ध्वजनी प्रथम शिटी वाजवितो तेव्हां सर्वजण शांतपणें उभे राहतात. ध्वजनी पुन्हां 'होशियार' ची सूचना देतो त्याबरोबर गायकगण 'वंदे मातरम्' हें राष्ट्रगीत म्हणतात. गीतानंतर 'नमस्ते' करून ध्वजदंडाची दोरी सोडून जोराचा हिसडा देऊन ध्वज फडकविला जातो. यानंतर २ मिनिटें चांगल्या सुरावर बँड वाजतो. मग 'कदमखोल' हुकूम मिळतो. जनसमुदाय पाय रुंद करून नेहमीच्या पद्धतीने उभा राहतो व ध्वजाची दोरी दंडाला नीट बांधली जाते. पुन्हां 'होशियार' हुकूम मिळतो व राष्ट्रगीत होतें. ध्वजनी 'भारत माताकी' म्हणतो. इतर लोक 'जय' म्हणतात.

पुन्हा ध्वजनी 'वंदे' म्हणताच इतरांकडून 'मातरम्' चा प्रतिसाद मिळतो. एवढें झाल्यावर ध्वजनी 'कदम खोल' ची सूचना देतो. अध्यक्षांचें भाषण यानंतर होतें. अध्यक्षीय भाषणानंतर ध्वजनी पुन्हा 'होशियार' सूचना देतो. ही सूचना गमनार्थ असतो. शिस्तींत शांतपणें प्रत्येकानें गमन-मार्गानें झेंडा चौकांतून निघून जावयाचें असतें व हा समारंभ संपतो.

भारताची राजधानी दिल्ली किंवा राज्यांच्या मुख्य ठिकाणीं म्हणजे मुंबई–मद्रास–कलकत्ता अशा जागीं १५ ऑगस्ट किंवा २६ जानेवारी या दिनीं जे ध्वजारोहणाचे समारंभ होतात ते वरील संकेतानुसार होत असतात. अशा वेळीं परदेशी वकील व अन्य पाहुणे मंडळी आमंत्रित केलेली असतात. भारताच्या विदेशी मंत्रालयांतहि भारतीय राजदूत विधिपूर्वक हे समारंभ साजरे करतात. अशाप्रसंगीं शांतता व शिस्तपालन या गोष्टींना फार महत्त्व आहे व ती योग्य त्या तऱ्हेनें पाळली जाते.

## नागरिक व राष्ट्रप्रतिष्ठा

प्रत्येक स्वतंत्र राष्ट्रांत असें ध्वजारोहण शांतता व शिस्तीनें संकेतानुसार केलें जातें. तो राष्ट्रीय उत्सवाचाच दिवस मानला जातो आणि अशाप्रसंगीं विदेशी राष्ट्रदूत व इतर जनता यांनाही अगत्यपूर्वक आमंत्रण देण्याची सर्व राष्ट्रांची पद्धति असते. अशा वेळीं जर बेशिस्तपणा झाला

तर त्या राष्ट्राची जनता बेशिस्त असल्याचा ग्रह विदेशी जनतेचा होऊं शकेल व विदेशांत अशा राष्ट्रांची बदनामी होण्याचा संभव असतो. यासाठीं ध्वजारोहणच नव्हे तर असे राष्ट्रीय स्वरूपाचे समारंभ शिष्टसंमत संकेतांनीच पार पाडावे लागतात. प्रत्येक व्यक्ति ही आपल्या राष्ट्राची प्रतिनिधी असते व राष्ट्र प्रतिष्ठा त्याक्षणीं त्या व्यक्तिच्या हातीं असते.

लेखकाच्या अवलोकनांत अशी गोष्ट आली आहे कीं विदेशी लोक आपल्या राष्ट्रप्रतिष्ठेला फार मान देताल व दुसऱ्यांच्याहि राष्ट्रीय चिन्हांबद्दल आदर दाखवितात. याच न्यायानें भारतीय जनतेलाहि राष्ट्रप्रतिष्ठेला फार जपलें पाहिजे व अन्य राष्ट्रीय चिन्हांचा मान राखला पाहिजे, तरच परस्पर राष्ट्रसंबंध स्नेहाचे राहतात, कटुता नष्ट होते. एका सिनेमागृहांत खेळानंतर राष्ट्रध्वजदर्शनानंतर राष्ट्रगीताचे वेळीं शांत उभे न राहतां निघून जाणाऱ्या ७–८ व्यक्तींना जपानी लोकांनी अडवून आमच्याच राष्ट्र-गीतासाठीं थांबण्यासाठीं विनंति केलेली लेखकानें स्वत: पाहिलेलें आहे. स्वकर्तव्याची जाणीव परदेशियांनीं द्यावी यासारखें दुर्दैव आणखी कोणतें? राष्ट्रध्वज किंवा राष्ट्र-गीताचा योग्य तो मान सिनेमा खेळानंतर राखला जात नाहीं अशा तक्रारींचें लिखाण ‘गोमन्तक’ च्या ‘मला

वाटतें' सदरांत पुष्कळ वेळां प्रसिद्ध झालेलें आहे. ही गोष्ट अभिमानी मनुष्यास लाजीरवाणीच वाटेल.

## कर्तव्याची जाणीव हवी

उत्तम नागरिक, राष्ट्रीय वृत्तीची वाढ, स्वराष्ट्राची प्रतिष्ठा वगैरे पुष्कळ गोष्टी साध्य करण्याचा आपल्या सरकारचा हेतु, अशा सिनेगृहांत खेळानंतर राष्ट्रध्वज व गीत कार्यक्रमामागें असतो. सामान्य जनतेला स्वराष्ट्रध्वज व गीत यांची नेमकी कल्पना असावी ही दक्षता सरकार घेत असतां जनतेनें सरकारी हेतूंची अशी उपेक्षा करणें योग्य नव्हे.

आज २६ जानेवारी भारताचा गणतंत्रदिन, वर लिहिलेल्या अपेक्षेप्रमाणें नागरिकांनीं, शालेय कुमारांनी आपापल्या स्थानीं शिस्त व शांतप्रियतेनें ध्वजारोहण करावें सुशिक्षित जनतेने अशिक्षित बांधवांस शांतपणें अशा वेळेच्या आचारांची कल्पना दिल्यास ते आपले बांधव योग्य साथ देतील यांत शंका नाहीं. उलट अशी नीट कल्पना देऊन प्रसंगाला शोभा व गांभीर्य प्राप्त करणें हें कर्तव्यच होय. वरील हेतु आजच्या नव्या पिढीनें, शालेय विद्यार्थ्यांनी आत्मसात केला तर पुढील पिढी खरीखुरी राष्ट्रीय् वृत्तीची बनविण्याचें श्रेय आम्हांला मिळेल व माझ्या या लेखाचें कार्य झालें असें मी समजेन.

यासाठीं आज सर्व भारतभर होणाऱ्या ध्वजारोहण प्रसंगाचें औचित्य जाणून सर्वांनीं या कार्यास सहकारभावनेनें साथ द्यावी व उत्तम नागरिककर्तव्य पार पाडावें अशी पुन्हां विनंति करावीशी वाटते.

उंच फडकवूं निशाण, वाहूं देशापायीं प्राण। सर्व मिळूनी हीच आण, सारे आपण घेऊं या. "जयहिंद" सारे गर्जुया। या शुक्ल कविच्या पंक्तींप्रमाणें साऱ्या भारतांत आज नवचैतन्याचें वारें संचारेल आणि सर्वत्र जो राष्ट्रध्वज फडकलेला आपण पाहूं, त्यामुळें स्वतंत्र भारताचे आपण नागरिक हा सार्थ अभिमान प्रत्येकाच्या ठायीं दिसेल यांत शंका कसली? आजचा हा राष्ट्रीय सण, हा प्रत्येकाचा आहे व तो तसा राहणारच. 'जयहिंद' च्या घोषणांनीं क्षात्रतेजाची आठवण करून देणाऱ्या या भारताच्या तिरंगी अशोक चक्रयुक्त ध्वजास माझे कोटि कोटि प्रणाम! जयहिंद!

'गोमंतक' प्रजासत्ताकदिन विशेषांक,
दि. २६-१-६४.

22723
30.1.68
SIMLA

# राष्ट्रध्वजाचा गैरवापर

स्वराष्ट्राच्या ध्वजाचा, घटनेने दिलेल्या अधिकारांप्रमाणें सुयोग्य वापर, उत्तम नागरिक जाणीवपूर्वक करतो. ही जाणीव ज्यांना नसते अशाच नागरिकांकडून किंवा देशद्रोही प्रवृत्ति असण.ऱ्यांकडूनच राष्ट्रध्वजाचा गैरवापर होण्याचा संभव असतो. यासाठीं प्रथम "राष्ट्रध्वज" ही कोणत्या मोलाची वस्तु आहे, हें जाणून घेतलें पाहिजे. म्हणजे या ध्वजाचा गैरवापर करण्याची कोणत्याहि देशाभिमानी नागरिकास इच्छाच उरणार नाहीं.

## राष्ट्राची एकमुखी मान्यता

स्वतंत्र भारताची 'राज्यघटना' तयार करण्यासाठीं जी घटनापरिषद भरली होती त्यांत देशांतील सर्व जाति, दर्जा, वर्ग आणि संस्थानांचे प्रतिनिधी होते; तसेंच हिंदु, शीख, मुस्लिम, ख्रिश्चन आणि पारशी या धर्मांचेहि प्रतिनिधी होते. या सर्व प्रतिनिधींनी 'नीलचक्रांकित तिरंगी राष्ट्रध्वज' हा भारताचा म्हणजे भारताला स्वदेश मानणाऱ्या प्रत्येक भारतीयाचा आहे असें मान्य करून

घेतलें आहे. या ध्वजाच्या रूपानें भूतकालांतील एकंदर राष्ट्रीय भावना व भविष्य कालांतील देशाच्या अपेक्षा व्यक्त करून दाखविल्या आहेत. यासाठीं स्वराष्ट्रध्वजाची संपर्ण माहिती असणें आणि त्याचा योग्यवेळीं जाणीव-पूर्वक वापर करणें हें प्रत्येक भारतीयाचें प्रमुख कर्तव्य आहे. राष्ट्रध्वजाचा योग्य मान राखणें, त्यांत समाविष्ट असलेल्या तत्वांचें पालन करणें, प्रसंगीं ध्वजासाठीं प्राण-त्यागासहि तत्पर असणें हें भारतीयांस अभिमानास्पद असेंच कृत्य आहे व सदैव असलें पाहिजे, हा वारसा पुढील पिढीला मिळाला पाहिजे.

## राष्ट्रध्वज म्हणजे काय?

प्रत्येक स्वतंत्र राष्ट्राला स्वतःचा ध्वज असतो. स्वातंत्र्य-प्राप्तीसाठीं देहार्पण केलेल्या थोर नेत्यांची आठवण त्यांत असते, तसेंच नागरिकांच्या उत्कर्षाचा मार्गहि त्यांत अभिप्रेत असतो. राष्ट्राचें स्वातंत्र्य हा ध्वज डौलानें फडकत राहून सर्व जगाला सांगत असतो. राष्ट्राला स्वाभिमान, अन्यायाची चीड, कर्तव्याची जाणीव, सहकार्य आणि बंधुभाव यांची शिकवण हा ध्वज अहोरात्र देत असतो. राष्ट्राच्या भावना त्यांत व्यक्त केलेल्या असतात. राष्ट्राच्या स्वातंत्र्याची ती खूण आहे, प्रतीक आहे. हात-रुमालासारखा तो सामान्य कपडा किंवा फडकें नव्हे.

सप्तरंगी सहकार ध्वज किंवा एखाद्या विशिष्ट ध्येय-पालनासाठीं तयार केलेल्या, कांहीं संस्था अथवा जनसमूह यांनी विशिष्ट रंगरूप दिलेला ध्वज हे कांहीं राष्ट्रध्वज नव्हेत. सेनादलांना मिळणारे ध्वज व देवालयांवर फडकणारे विशिष्ट ध्वज हेही राष्ट्रध्वज नव्हेत. तो स्वतंत्र नागरिकाच्या स्वातंत्र्याचा पवित्र व आदरणीय असा ठेवा आहे.

येथें नागरिक आणि प्रजाजन यांतील फरक स्पष्ट करण्याचा मोह होतो. दुसऱ्या राष्ट्रांचें स्वातंत्र्य संपुष्टांत आणून आपली अधिसत्ता त्या राष्ट्रावर चालविणें हें साम्राज्यशाहीचें लक्षण आहे. अशाप्रकारें दुसऱ्या राष्ट्राचें वर्चस्व असणारे ते त्या साम्राज्याचे प्रजाजन होत. पण स्वतंत्र राष्ट्रांतील प्रत्येक मनुष्य हा त्या राष्ट्राचा नागरिक होय. अर्थात नागरिक म्हणून मानानें जगणारा स्वातंत्र्य-प्रेमी माणूस प्रजाजन बनण्याचा हव्यास कधींच धरणार नाहीं. आपला भारतीय राष्ट्रध्वज हा साम्राज्याचा निदर्शक नसून तो संपूर्ण भारतीय स्वातंत्र्याचा द्योतक आहे, हें प्रत्येकानें ध्यानीं वागवावें.

## राष्ट्रध्वज केव्हां वापरतात

१) भारताचा स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्ट, २) भारताचा गणराज्यदिन २६ जानेवारी, ३) महात्मा गांधी

जन्मदिन २ आक्टोबर, ४) राष्ट्रीय सप्ताह समय, ५) विशिष्ट प्रसंगीं मिळणारे सरकारी आदेश अशा समयींच राष्ट्रध्वजाचा वापर करावयाचा असतो. याशिवाय इतर-वेळीं राष्ट्रध्वज फडकवितां येणार नाहीं. घटनेंत घालून दिलेले नियम आणि रूढ संकेत अशा वेळीं कसोशीनें पण श्रद्धापूर्वक नागरिकांनीं पाळावे लागतात. त्याची फडक-विण्यची वेळ बिनचूक पाळावी लागते, त्याची केशरी रंगाची पट्टीच वर असावी लागते, ध्वज फडकविल्यावर शिस्त व शांतता पाळून राष्ट्रगीत म्हटलें पाहिजे. संध्या-काळीं ६ वाजतां तो सन्मानानें उतरविला पाहिजे.

## राष्ट्रध्वज कुठें वापरतात?

राष्ट्राच्या राष्ट्रपतिचें भवन, राज्यपाल भवनें, राज्यसभाध्यक्ष, लोकसभाध्यक्ष आणि विधानसभाध्यक्ष यांचीं निवासस्थानें, भारत सरकारांतील मंत्री, तसेंच घटक राज्यांचे मंत्री यांचीं वसतिस्थानें, विदेशांतील भारतीय राजदूत, चीफ कमिशनर, जिल्हाधिकारी यांची निवास-स्थानें, भारताचें सर्वोच्च न्यायालय व घटक राज्यांचीं उच्च न्यायालयें, भारत सरकार आणि राज्य सरकारें यांचीं सचिवालयें व जेल या इमारतींवरच राष्ट्रध्वज वापरण्याचा हक्क घटनेनें दिलेला आहे. त्याचप्रमाणें राज्यपाल, भारताचे विदेशांतील दूत, भारताचे मंत्री व

उपमंत्री, घटक राज्यांचे मंत्री, राज्यसभा, लोकसभा, विधानसभा यांचे अध्यक्ष, चीफ कमिशनर, परदेशीं गेलेलीं भारतीय शिष्टमंडळें यांच्याच मोटारींवर पुढच्या सर्वांना स्पष्ट दिसेल अशा जागीं तो लावतात. या मोटारीवर हा ध्वज लावल्यानंतर तो कोणत्याहि कारणानें पडतां कामा नये किंवा मोटारीच्या पुढच्या भागाशिवाय इतरत्र तो कुठेंहि लावतां कामा नये असा सक्त नियम आहे.

## कांहीं खास ध्वज

राष्ट्रपति, राज्यपाल, भारताचे सरसेनापति, भारताचे सागरी दलप्रमुख आणि हवाईदल प्रमुख यांच्यासाठीं स्वतंत्र असे खास ध्वज असून हे खास ध्वज वापरतांना राष्ट्रध्वज कसा वापरावा याचे त्यांच्याकरितां निराळे स्वतंत्र नियम आहेत. या नियमांप्रमाणेंच खास ध्वजासह राष्ट्रध्वज वापरला जातो. या विशिष्ट ध्वजांचा उपयोग दुसऱ्या कोणालाहि केव्हांही व कोठेंही करण्याचा कायद्यानें अधिकार दिलेला नाहीं. तो गुन्हा आहे.

## राष्ट्रध्वजाचा गैरवापर

राष्ट्रध्वजाचा गैरवापर कशाप्रकारें होतो हें नीट जाणून घेतलें पाहिजे हा गैरवापर जाणून बुजून होणें किंवा अनवधानानें होणें हें कायद्यानें शिक्षेस पात्र आहे.

मग ती व्यक्ती लहान असो किंवा थोर असो, मूर्ख असो किंवा विद्वान असो, सामान्य असो किंवा अधिकारी असो तिला शिक्षा ही ओघानें आलीच. जाणीव ठेवून वापर न करणें म्हणजेच गैरवापर होय. हा गैरवापर पुढील प्रकारें होण्याचा संभव असतो. १) ध्वजाची हिरवी पट्टी वर करून तो फडकविणें. २) राष्ट्रीय दिनाशिवाय किंवा सरकारी आदेशाविरहित तो उभारणें. ३) मोटारी, सायकली, बैलगाड्या वगैरे वाहनांवर तो वापरणें. ४) कपडे--कोट, शर्ट, गंजिफ्राक किंवा चादरी, पायपुसणीं, सतरंज्या, उशा, पडदे, गालिचे, टेबलक्लॉथ वगैरे कपड्यांवर तो चितारणें. ५) कारखान्यांतील तयार माल अथवा व्यापारी वस्तु यांच्या प्रसिद्धीसाठीं त्यांवर राष्ट्रध्वजाची आकृति काढणें. ६) राष्ट्रध्वज पायदळीं पडेल असा वापरणें. ७) जाहीर सभा वगैरे ठिकाणीं व्यासपीठाखालीं राष्ट्रध्वज येईल असा उभारणें. ८) तो अर्ध्यावरच फडकविणें. ९) घरें किंवा इमारती यांचीं दारें, छत, खिडक्या यांवर राष्ट्रध्वजाच्या प्रतिमा रंगविणें किंवा खोदणें. १०) राष्ट्रध्वज जमिनीवरून फरफटत नेणें. ११) सरकारी भवनें किंवा व्यक्तिचीं निवासस्थानें यांवर फडकत असलेला ध्वज काढणें. १२) फाटलेला, मळलेला किंवा रंग विटलेला ध्वज वापरणें. १३) घटनेनें मान्यता दिलेल्या अशोक चक्राशिवाय इतर

चिन्ह, अक्षर, वेलबुट्टी ध्वजावर काढणें. १४) ध्वज फाडणें, जाळणें किंवा दुसऱ्याला अशा कामासाठीं उद्युक्त करणें. १५) ध्वजाची लांबी उंचीच्या १॥ पट असते. या प्रमाणाशिवाय अन्य प्रमाणांत तो तयार करणें किंवा करविणें. अशा विविध प्रकारें त्याचा गैरवापर होण्याचें भय राहतें. शिवाय ध्वजाविषयीं अनुचित उद्गार काढणें हेंहि गैर आहे. तो राष्ट्राचा अपमान आहे.

प्रत्येक राष्ट्रांत त्या देशाच्या राष्ट्रध्वजाला अग्रस्थान आणि इतर राष्ट्रध्वजांना दुय्यम स्थान असतें. स्वतःचा राष्ट्र-ध्वज उंच व अन्य राष्ट्रांचे ध्वज त्यापेक्षां कमी उंचीवर फडकविण्याचा आंतरराष्ट्रीय संकेत आहे. यांत इतर राष्ट्रांचा अपमान नसून त्यांना दुय्यम स्थान आहे असा आंतर-राष्ट्रीय नियम आहे. राष्ट्रीय शोकप्रसंग किंवा सुतक वगैरे उद्भवल्यास राष्ट्रध्वज अर्ध्यावर उभारणें हाहि नियम आहे. अन्यवेळीं तो ध्वजदंडाच्या पूर्ण उंचीवरच उभारला पाहिजे. तसेंच ध्वजारोहण झाल्यावर पाऊस पडण्याचा संभव असल्यास, तो विधिपूर्वक खालीं उतरवून पाऊस गेल्यावर पुन्हा फडकवितात.

राष्ट्रध्वजाच्या गैरवापर हा अशा प्रकारें होत असतो किंवा त्याचा अपमान केला जातो त्यावेळीं भारतीय घटनेप्रमाणें गुन्हेगार व्यक्ति कायद्याप्रमाणें दंड किंवा जेल अथवा दोन्ही शिक्षा भोगण्यास पात्र ठरते. यासाठीं

आपणाकडून बेकायदा वर्तन होणार नाहीं याची खबरदारी घेणें आवश्यक आहे. अशा स्वरुपाचें नियमबाह्य वर्तन दुसरा कोणी करीत असेल तर त्यास हरकत घेऊन ध्वजाचा आदर व पावित्र्य टिकविलें पाहिजे. अशी काळजी प्रत्येकानें घेतल्यास आजच्या लहान मुलांना तें बोधपर होऊन त्यांचे अंगी खरी राष्ट्रीय वृत्ति बाणेल यांत शंका नाहीं.

भारताचे अत्यंत लाडके पंतप्रधान आणि जगांत शांततेचे पुरस्कर्ते म्हणून सर्वमान्य झालेले श्री. जवाहरलाल नेहरु हे अचानकपणें गेल्या मे २७ ला आम्हांला सोडून गेले. सर्व राष्ट्रानें सुतक पाळलें. जगांतील इतर राष्ट्रेंहि भारताच्या या दुःखांत सहभागी झालीं. त्यावेळीं राष्ट्रीय दुःख म्हणून भारतीय राष्ट्रध्वज नियमानुसार अर्ध्यावर फडकवला गेला. पण पुष्कळ व्यक्तीनीं राष्ट्रध्वज खासगी-रीत्या आपापल्या घरांवर दुःखप्रदर्शनार्थ उभारण्याची परवानगी मागितली असतां तज्ज्ञ मंडळीनें असा निर्णय दिला कीं, "ज्या सार्वजनिक इमारतीवर सर्वसाधारणपणें वर्षभर राष्ट्रध्वज फडकत असतो त्याच ठिकाणीं सरकारी दुखवटयाच्या काळांत राष्ट्रध्वज अर्ध्यावर लावला जावा. खासगी इमारतींवर राष्ट्रध्वज लावूं नये." गैरवापर होण्याचे दृष्टिनें ही विनंति करण्यांत आली होती.

स्वतःचा राष्ट्रध्वज जसा आम्हांला प्रिय तसाच अन्य राष्ट्रांचा त्यांना प्रिय आहे म्हणून दुसऱ्या राष्ट्रांचे ध्वजांचाहि अपमान आपणांकडून होतां कामा नये. तो गंभीर स्वरुपाचा गुन्हा आहे हेंहि ध्यानीं घेतलें पाहिजे राष्ट्रध्वजाबरोबर राष्ट्रगीतहि आलेंच. त्याचाहि योग्य तो मान प्रत्येकाने राखण्याची जाणीव ठेवली पाहिजे.

## राष्ट्रसेवादलाचें मासिक झेंडावंदन

आपल्या भारतांत "राष्ट्रसेवादल" या संस्थेतर्फे १९२८ सालापासून मासिक "झेंडावंदन" हा कार्यक्रम व्यवस्थितपणें होत असतो. यामुळें आपल्या राष्ट्रध्वजाची प्रतिष्ठा उत्तम प्रकारें पाळली जात आहे.

काँग्रेस पक्षाच्या वार्षिक अधिवेशनापूर्वी प्रत्येक वेळीं हा विधि काँग्रेसनगरांत पार पाडतात. प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या रविवारीं ठीक ८ वा. झेंडावंदनाचा विधि देशांत सर्वत्र राष्ट्रसेवादलातर्फे होत असतो. त्यामुळेंच आपल्या राष्ट्रध्वजाची प्रतिष्ठा उत्तरोत्तर वाढत आहे.

## शालेय कार्यक्रमांत जनतेनें भाग घ्यावा

देशांत १५ ऑगस्टचा स्वातंत्र्यदिन आणि २६ जाने. गणराज्यदिन पाळला जातो. सरकारी कचेऱ्या व शाळा, कॉलेजें या ठिकाणीहि ध्वजारोहण होत असतें.

अशा प्रसंगीं जवळच्या जनतेनें तसेंच शाळांतील मुलांच्या पालकांनीं या कार्यक्रमास कर्तव्य भावनेनें बहुसंख्येनें उपस्थित राहावें. केवळ शिक्षक आणि विद्यार्थी किंवा सरकारी पातळीवरून होणाऱ्या ध्वजारोहणास अधिकारी व कर्मचारी असें स्वरूप राहूं नये. यामुळें स्वाभाविकच देशांतील प्रत्येकाला या कार्यक्रमाची नीट जाणीव होईल. विशेषतः शालेय कार्यक्रमांत गावांतील पालक उपस्थित राहिल्यास मुलांच्या दृष्टीनें तें विशेष महत्त्वाचें आहे. साहजिकच मुलांच्या अंगी राष्ट्राभिमान, शिस्त, शांतता व स्वाभिमान या गुणांची वृद्धि होईल. त्यांना अशा कार्यक्रमांत गोडी वाटेल आणि अराष्ट्रीय वृत्ति नष्ट करण्यासहि त्याचा फार उपयोग होईल.

सध्या विविध वृत्तपत्रें वाचल्यास राष्ट्रध्वज किंवा राष्ट्रगीत यांचा योग्य आदर न राखल्याचीं वृत्तें कळून येतात. ही अराष्ट्रीय भावना बळावल्यास आपल्याच देशाचे आपण शत्रू ठरूं. ही वृत्ति लहान मुलांत न बळावण्याची खबरदारी घेण्यासाठीं देशाच्या प्रत्येक नागरिकानें सावधगिरी बाळगली पाहिजे.

भारतांतून इंग्रजांचा 'युनियन जॅक' जो १४ ऑगस्ट ४७ च्या रात्रीं खाली उतरवून स्वतंत्र भारतीय राष्ट्रध्वज त्याचवेळीं फडकला तो आमच्या स्वातंत्र्याची, संरक्षणाची हमी देत असून पुढील उत्कर्ष, दीर्घोद्योग,

बंधुभाव, त्याग आणि सेवा यांची देशवासियांकडून अपेक्षा करीत आहे. यासाठीं राष्ट्रध्वजाचा मान राखणें म्हणजेच सर्व भारतीय जनता, त्यांच्या भावना याची कदर करणें होय.

सच्चा भारतीय नागरिक आपल्या या तिरंगी राष्ट्रध्वजाची प्रतिष्ठा वाढवील, त्याचेसाठीं प्रसंगी प्राणार्पणहि करील यांत शंकाच नाहीं. आणि असें होत राहिल्यावर त्याचा अपमान किंवा गैरवापर करण्याचें कारणच उरणार नाहीं.

—: जयहिंद :—

'गोमंतक' स्वातंत्र्यदिन विशेषांक.
दि. १५–८–१९६४.

भाग २ रा

## अन्य राष्ट्रीय प्रतीकें

# भारताचीं राष्ट्रगीतें

भारतीय घटनेनें "जनगनमन" व "वंदेमातरम्" या गीतांस राष्ट्रगीतें म्हणून मान्यता दिलेली आहे. पैकीं भारत सरकारचे राष्ट्रीय पातळीवरून होणारे देशांतील आणि विदेशांतील कार्यक्रम "जनगणमन" या गीतानें साजरे केले जातात. हेंच राष्ट्रगीत म्हणण्याची प्रथा सभा, समारंभांतून चालू आहे.

"जनगणमन" गीत बँड वाद्याच्या साथीला जुळणारें असल्यामुळें तेंच प्रचारांत घेण्याचें ठरलें हे त्याचें मुख्य कारण. दुसरें गीत "वंदेमातरम्" हें बँडच्या साथीला जुळत नाहीं. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या "आझाद हिंद फौजेचें" जनगणमन हेंच राष्ट्रगीत होतें. या गीताचे जनक गुरुदेव रविंद्रनाथ टागोर.

कलकत्ता कॉंग्रेस अधिवेशनांत टागोरांनीं हें गीत, २७-१२-१९११ रोजीं प्रथम गाऊन दाखविलें. नंतर १९१२ सालच्या जानेवारीमध्यें तें, तत्वबोधिनी पत्रिकेंत

प्रथम प्रसिद्ध झालें. त्यांत या गीताचें शीर्षक "भारत भाग्य विधाता" असें होतें. यांत एकंदर ५ कडवीं असून पहिलें १ च कडवें राष्ट्रगीत म्हणून मान्य केलें गेलें आहे.

जनगणमन अधिनायक जय हे। भारत भाग्य विधाता ।।
पंजाब सिंधु गुजराथ मराठा। द्राविड उत्कल वंग ।।
विंध्य हिमाचल यमुना गंगा। उच्छल जलधि तरंग ।।
तव शुभ नामें जागे। तव शुभ आशिस मागे।
गाहे तवयशगाथा ।।
जनगणमंगलदायक जय हे भारतभाग्य विधाता ।।
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय जय हे ऽऽऽ ।।१।।

हेंच तें राष्ट्रगीत म्हणून स्वीकारलेलें गीत. भारतीय घटना परिषदेनें २४ जानेवारी १९५० रोजीं या गीताला राष्ट्रगीत म्हणून मान्यता दिली.

भारताचे प्रदेश, नद्या, पर्वत, सभोंवतालचा सागर हे सर्व भारताची स्तुति गातात, अशीर्वाद मागतात. भारतभूमिचा जयजयकार करतात व भारताचें मंगल इच्छितात. हे भाग्य निरंतर राहो अशी प्रार्थना करतात असा त्याचा अर्थ आहे. स्वतः टागोर हें गीत गातांना तल्लीन होत. हें भारताचें प्रभात गान म्हणून प्रसिद्ध आहे. स्वतः टागोर हें भारताचें "यशोगान" आहे असें म्हणत असत. मातृभूमिवर त्यांची अपार श्रद्धा होती. पुढें १९१९ सालीं त्यांनी इंग्रजींत त्याचें भाषांतर केलें.

या गीताद्वारें टागोरांनी भारतीयांना राष्ट्रनिष्ठेचा संदेश दिला आहे. राष्ट्राची शक्ति, संपत्ति व महानता दाखवून दिली आहे.

दुसरें राष्ट्रगीत "वंदेमातरम्" होय "जनगणमन" हें जरी आज सर्वत्र प्रचारांत असलें तरी भारतीयांचें खरें राष्ट्रगीत "वंदेमातरम्" हेंच होय. हेहि घटनेनें मान्य केलेलें आहे व त्याचें महत्त्वहि तसेंच अनन्य साधारण आहे. देश परतंत्र असतांना या गीताच्या घोषांतच लाखों भारतीय फासांवर चढले. कोटचवधि भारतीयांना याच गीताने स्फूर्ति दिली. या गीताला ऐतिहासिक व भावनिक ऐक्याची पार्श्वभूमि आहे. १८५७ च्या क्रांतिनंतर भारतीयांची "वंदेमातरम्" हीच घोषणा होती. इंग्रज अधिकारी या गीताच्या उच्चारानें भडकून जात. लहान शाळकरी मुलें त्यांना चिडविण्यासाठीं मुद्दाम मोठचानें "वंदेमातरम्" म्हणत. या उच्चारानेंच त्या इंग्रज अधिकाऱ्यांचा तिळपापड उडत असे.

हें गीत बंगालचे साहित्यसम्राट बंकिमचंद्र चतर्जी यानीं रचिले. 'आनंदमठ' कादंबरी त्यांनी १८८२ सालीं प्रसिद्ध केली. त्यांत हें गीत आहे. बंकिमचंद्र डॉ. टागोरांना गुरुस्थानीं होते. त्यांच्याच सूचनेवरून टागोरांनीं ते कॉंग्रेस अधिवेशनांत १८९६ सालीं गाऊन दाखविलें होतें. त्यावेळीं श्रोते देहभान हरपलें असें सांगतात.

बंकिमचंद्र हेहि थोर देशभक्त होते. आनंदमठ कादंबरींतून त्यांनीं भारतीय तरुणांना स्वातंत्र्याचा संदेश दिलेला आहे. स्वदेशसंरक्षण व स्वातंत्र्य या हेतुसाठीं एका मठांतील साधुलोक सुसंघटितपणें शस्त्रसज्ज होऊन शत्रूशीं लढा देत देत भारतमातेच्या चरणीं प्राणार्पण करतात अशी कथा त्यांत आहे. त्यांतील साधु भवानंद सांगतो, "भारतमाता हीच आपली आई आणि भारतीय जनता हेंच आपलें कुटुंब." राष्ट्रप्रेमाचा हाच दिव्य संदेश या कादंबरींत आहे. अर्थात् यांतील "वंदेमातरम्" या गीतामुळें इंग्रज सरकारनें ही कादंबरी जप्त केली. पुढें १९३७ सालीं तात्पुरत्या कॉंग्रेस मंत्रीमंडळानें ही जप्ती उठविली.

बाबा, तुम्ही नेहमी कादंबऱ्या लिहितां. कवितां कां नाहीं लिहीत? असा मुलीनें एकदां प्रश्न विचारल्यावर बंकिमचंद्र म्हणाले होते, "तुझं म्हणणं खरं आहे, मी आनंदमठ कादंबरींत एक कविता लिहिली आहे आणि ती खात्रीनं अमर होईल" त्यांचे हे उद्‌गार भारतीय स्वतंत्र्या-नंतर खरेच ठरले. ती थोर देशभक्ताची वाणी होती.

भावनिक एकता, देशनिष्ठा आणि ऐतिहासिक श्रद्धा यामुळेंच या गीताला अफाट लोकप्रियता मिळाली. एरवीं इंग्रजांना जप्त करण्यासारखें आनंदमठ कादंबरींत कांहींच नव्हतें.

भारतीय स्वातंत्र्यानंतर जरी ही दोन्ही गीतें राष्ट्रगीतांच्या मालिकेंत जाऊन बसलीं तरी भारतीय जनतेनें केव्हांच त्यांना आपल्या हृदयांत स्थान दिलेलें आहे. तो पारतंत्र्याचा काल होता हें लक्षांत घेतलें पाहिजे. बंगालचें या राष्ट्रगीतांच्या रुपानें भारतावर हें ऋणच आहे.

स्वातंत्र्याचा खडतर मार्ग आक्रमण करण्यास, ध्येयनिष्ठ भारतीय देशभक्तांस याच गीतानीं उत्साह, शक्ती व स्फूर्ति दिली आहे.

रजपुतांची समरगीतें, मराठ्यांचे पोवाडे आणि अशाच स्वरुपाचीं देशांतील अन्य बांधवांचीं संग्रामगीतें हीं सुद्धां स्वातंत्र्य लालसेनेंच रचिलीं गेलीं आहेत. भाट, चारण, शाहीर हा गायकवर्ग, मुसलमानी सत्ताकालांत भारताच्या स्वातंत्र्यासाठीं नवजवानांना वीरश्रीयुक्त कवनांनी लढाईस उद्युक्त करी. भारताची स्वातंत्र्याची धडपड फार जुनी आहे.

राष्ट्रगीतें, संग्रामगीतें, पोवाडे, समरगीतें हा राष्ट्रीय वाङमयप्रकार मानला गेला पाहिजे. अशा गीतांना तो हक्क मिळाला पाहिजे. राष्ट्रगीतें हीं राष्ट्राचीं स्तुतिसुमनें होत. "जनगणमन" हें भारताचें यशोगीत मानल्यास "वंदेमातरम्" हें मातृगीत आहे.

ज्या मातृभूमित आपला जन्म झाला, भरण पोषण झालें, त्या मातृभूमीचीं राष्ट्रगीतें कर्तव्यबुद्धिनें आपण

कंठस्थ केलीं पाहिजेत. मातृभूमिच्या ऋणांतून मुक्त होण्यासाठीं राष्ट्रगीत गायनाचे वेळीं श्रद्धापूर्वक शांततेनें उभें राहणें हा तिचा सन्मान आणि तें मुखोद्‍गत् असणें हा तिचा अभिमान होय.

---

## आद्य राष्ट्रगीत

वन्दे मातरम् ।।

सुजलाम सुफलाम मलयज शीतलाम,
सस्य–शामलाम मातरम्। वन्दे मातरम् ।।
शुभ्रज्योत्स्ना पुलकित–यामिनीम,
फुल्लकुसुमित–द्रुमदल शोभिनीम्।
सुहासिनीम सुमधुर–भाषिणीम,
सुखदाम वरदाम मातरम्। वन्दे मातरम ।।

---

## राष्ट्रगीत कोणत्या प्रसंगीं म्हणावें किंवा वाजवावें?

केंद्र सरकारच्या आदेशपर सूचना.

भारत सरकारनें २०–२–१९६५ रोजीं पूर्ण व संक्षिप्त राष्ट्रगीतासंबंधीच्या सूचना प्रसिद्ध केल्या असून त्यामध्यें कोणकोणत्या प्रसंगीं राष्ट्रगीत म्हणण्यांत वा वाजविण्यांत यावें यासंबंधीं दिग्दर्शन केलें आहे.

बावन्न सेकंदपर्यंत चालणारें संपूर्ण राष्ट्रगीत खालील प्रसंगीं वाजविण्यांत यावें :–

१) सर्व प्रकारच्या समारंभ प्रसंगीं ज्यावेळीं राष्ट्रपति, राज्यपाल, नायब राज्यपाल व जम्मु व काश्मीरचे सदर–इ–रियासत यांना मानवंदना देण्याच्या प्रसंगी.

२) संचलनाच्या वेळीं वा अन्य समारंभप्रसंगीं, मग त्यावेळीं राष्ट्रपति, राज्यपाल आदि महत्त्वाच्या व्यक्ति हजर असोत वा नसोत नि त्यावेळीं जर राष्ट्रध्वजारोहण करण्यांत आलें तर संपूर्ण राष्ट्रगीत वाजविण्यांत यावे. हें राष्ट्रगीत तें ध्वजारोहण करणाऱ्या व्यक्तिचा सन्मान नसून तो राष्ट्रध्वजाचा सन्मान आहे असें मानण्यांत यावे.

३) ज्यावेळीं राष्ट्रपति स्वतः हजर असतील त्या सर्व प्रसंगीं–त्यामध्यें राष्ट्रपतिंच्या आकाशवाणीवरील भाषणाचाहि समावेश आहे, राष्ट्रगीत वाजविण्यांत यावें.

४) राज्यपाल, नायब राज्यपाल व जम्मु व काश्मीरचे सदर–इ–रियासत आपल्या राज्यामधील सर्व प्रकारच्या समारंभांना स्वतः हजर असतील त्यावेळीं.

५) संचलनानें राष्ट्रध्वज आणला असेल त्यावेळीं.

### ध्वज–प्रदान प्रसंगीं

६) ज्यावेळीं लष्करांतील एकाद्या विभागाला रेजिमेंटल ध्वज प्रदान केला असेल त्यावेळीं.

७) नौदलाचें ध्वजारोहण करण्यांत येईल त्यावेळीं.

यामध्यें राष्ट्रगीताच्या पहिल्या व शेवटच्या ओळी असून तें वाजविण्यासाठीं २० सेकंद कालावधि लागतो. हें गीत खालील प्रसंगीं वाजविण्यांत यावें :—

१) सार्वजनिक भोजनांतील आरोग्यपानाच्या (ड्रिंकिग ट्रोस्ट) प्रसंगीं.

२) सरकारनें खास आज्ञा काढलेल्या अन्य समारंभ प्रसंगीं.

३) विशेष प्रसंगीं पंतप्रधान उपस्थित असतांना.

राष्ट्रगीत केव्हां म्हणावें ?

खालील प्रसंगीं संपूर्ण राष्ट्रगीत म्हणण्यांत यावें :—

१) मंत्री हजर असलेल्या कोणत्याहि समारंभ प्रसंगीं.

२) सर्व विद्यालयांत सामुहिक राष्ट्रगीत म्हटल्यानंतर त्या दिवसाच्या कामकाजास प्रारंभ व्हावा.

आणीबाणीच्या प्रसंगी

आणीबाणीच्या काळांत खालील प्रसंगीं संपूर्ण राष्ट्रगीत वाजविण्यांत यावें :—

१) रात्रीं आकाशवाणीवरील सर्व कार्यक्रम संपल्यानंतर.

२) दुपारचे व सायंकाळचे चित्रपट संपल्यानंतर (१२-३० वा. ६-३०) राष्ट्रगीत वाजविण्यांत यावें.

३) सांस्कृतिक व नाटकाचे कार्यक्रम झाल्यानंतर.


परराष्ट्राचे राष्ट्रगीत वाजविण्यासंबंधीं.

खालील प्रसंगीं, प्रारंभीं परराष्ट्राचे राष्ट्रगीत वाजविल्यानंतर वा म्हटल्यानंतर लगेच भारताचें संपूर्ण राष्ट्रगीत म्हणण्यांत वा वाजविण्यांत यावें :-

१) परकीय पाहुण्यांच्या भारतांतील स्वागतप्रसंगीं, २) परराष्ट्राच्या वकिलातींनीं त्या राष्ट्राचे राष्ट्रीय दिन साजरे करण्यासाठीं आयोजित केलेल्या समारंभप्रसंगीं, ३) परराष्ट्राच्या वकिलातीतर्फे वा व्यापारी प्रतिनिधींतर्फे भारतांत चित्रपट वा अन्य सांस्कृतिक महोत्सव आयोजित केले असतील त्यावेळीं.

---

# राष्ट्रमुद्रा व राष्ट्रीय बोधवाक्य.




भारताची राष्ट्रमुद्रा किंवा बोध-चिन्ह "त्रिमूर्ति सिंह" (*Emblem*) हें अशोक कालीन, सारनाथ येथें उभारलेल्या खांबा वरील आहे. या सिंहांच्या बैठकीच्या दर्शनी भागांतच अशोकचें "धर्मचक्र" दाखविलें आहे. हेंच धर्मचक्र भारतीय राष्ट्र-ध्वजावर शोभत असतें.

भगवान् बुद्धांनीं आपल्या शिष्यांना अष्टविध मुक्ति मार्ग ज्या जागीं सांगितले त्याच स्थळीं अशोकानें हें "त्रिमूर्ति सिंह" शिरोभागीं असलेलें दगडी खांबाचें स्मारक उभारलें आहे. अशोक हा भारताचा सर्वश्रेष्ठ शासनकर्ता होऊन गेला व त्या कालाला अनुसरून अशीं कित्येक स्मारकें कोरीव लेखरूपानें त्यानें उभारलेलीं होतीं. हे लेख व चिन्हें हीं, अशोकाच्या राजाज्ञा व राजचिन्हें होतीं. हीं स्मारकें भारतभर आढळतात.

अशोकानें स्वीकारलेली ही "त्रिमूर्ति सिंह" मुद्रा म्हणजे सत्य, अहिंसा आणि धर्म यांचें द्योतक होय. या ३ सिंहांच्या रूपानें जनतेला राजाज्ञेबरोबर दिलेली ग्वाही.

अशोकाचाच आदर्श राजनीति म्हणून भारताला स्वीकारावयाचा होता म्हणूनच भारतसरकारनें ही मुद्रा "राष्ट्रमुद्रा" म्हणून मान्य केली. सत्य, अहिंसा, शांति, विश्वबंधुत्व या मार्गानेच भारतानें आपली वाटचाल करावयाची ठरविली आहे. या साठीं हें चिन्ह "राष्ट्रमुद्रा" झालें.

सरकारी नाणीं, टपाल तिकिटें व कार्डें पाकिटें, सरकारी कागदपत्रें, जाहीरनामे, हुकूम, सरकार तर्फे मिळणारी प्रशस्तिपत्रें, दाखले वगैरे सर्व प्रकारच्या सरकारी कागदांवर ही राष्ट्रमुद्रा "त्रिमूर्ति सिंह" आपणांस दिसून येते. तसेंच राष्ट्रपतिभवन, संसद, महामंत्री, राज्यपाल, मुख्य

मंत्री यांची सरकारी निवासस्थानें, सुप्रीम कोर्ट, हायकोर्ट अशा कित्येक ठिकाणीं ही राष्ट्रमुद्रा किंवा धर्मचक्र हमखास आढळतें. हा राष्ट्रसंकेत असून कटाक्षानें पाळला जातो.

राष्ट्राचा इतिहास, परंपरा, श्रद्धा, अशाअपेक्षा या राष्ट्रमुद्रेनें सूचित केल्या जातात.

"सत्यमेव जयते" हें भारताचें राष्ट्रीय बोध वाक्य होय. सत्यच जयाप्रत जातें हा त्याचा अर्थ. सत्यमार्गच भारताला मान्य असून, या वचनाप्रमाणें वागूं अशी ग्वाही, भारतानें आपल्या देशवासियांबरोबरच अन्य देशियांना या बोधवाक्यानें दिली आहे. "मांडूक्योपनिषद्" नांवाच्या उपनिषद् ग्रंथांतून हें वचन घेतलेलें आहे. स्वतः या वचना प्रमाणें वागून अन्य देशांनींपण तसेंच ध्येय धोरण ठेवावें ही भारताची अपेक्षा आहे. सत्य हें शाश्वतकल्याणकारी आहे याबद्दल भारताची खात्री आहे, निष्ठा आहे. सत्या–च्याच मार्गानें भारताबरोबर, अखिल मानवजातिचें हित साधेल अशी भारताची श्रद्धा आहे.

"सत्यमेव जयते" ही राष्ट्राची प्रतिज्ञा आहे. राष्ट्रपिता, महात्मागांधी, यांनी सत्यासाठींच आपलें जीवन वेंचलें. ते सत्यासाठीं जगले व सत्यासाठींच मृत्यु पावले. अन्य भारतीय पुढऱ्यांनी पण हाच सत्याचा थोर आदर्श स्वीकारला होता. हें बोधवाक्य व राष्ट्रमुद्रा यांचा घनिष्ठ संबंध आहे. दोनहजार वर्षांपूर्वी भारत ज्या वैभवांत होता आणि

आपल्या ज्ञानानें अखील जगाच्या गुरुपदीं विराजत होता, त्याच आदर्श मार्गाकडे भारताची वाटचाल आहे हें भारत या वचनानें दाखवून देत आहे. तसा प्रयत्नही करीत आहे.

हें बोधवचन संस्कृत भाषेंतून घेतलेलें आहे. संस्कृत ही भारताची प्राचीन भाषा आहे. सर्व जगांत मान्य झालेली आणि त्या संस्कृत भाषेचा वारसा प्राप्त झालेली भारत-भूमि या देवभाषेमुळेंच जगाला आदर्श ठरली " सत्यमेव-जयते " हे राष्ट्राचें बोधवाक्य आहे तसेंच भारतीय नौद-लाचें, " शं नो वरुणः " हें बोधवाक्य आहे. तो वरुणदेव आमचें कल्याण करो असा त्याचा अर्थ आहे. भारतीय आयुर्विमा संस्थेचें " योगक्षेमं वहाम्यहम् " हें भगवद्गीतें-तील बोधवाक्य आहे. भारतांतील कित्येक शिक्षणसंस्थानीं अशींच संस्कृतमधील बोधवाक्यें स्वीकारलेलीं आढळतात. " सा विद्या या विमुक्तये " " संहतिः कार्यसाधिका " "निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु" हीं ती बोधवचनें होत. हीं वचनें संस्कृत भाषेंतील ठेवा आहे.

बोधवाक्य आपला हेतु, आशय किंवा सारांश स्पष्ट करतें. इष्ट ध्येय बोधवाक्य सूचित करीत असतें हेंच त्याचें मर्म.

राष्ट्रमुद्रा हा राष्ट्रपुरुषाचा देह मानल्यास राष्ट्रीय बोध-वाक्य ही त्या राष्ट्रपुरुषाची प्रतिज्ञा किंवा मुखवाणी होय.

# राष्ट्रपक्षी मोर



मोर हा भारताचा राष्ट्रपक्षी आहे. मोराला "मयूर" अशी संज्ञा संस्कृत भाषेंत आहे. विद्यादेवी सरस्वती हिचें मोर हें वाहन आहे. तसेंच शिवपुत्र कार्तीकस्वामी याचेंहि वाहन मोर आहे.

मोर पक्षाला राष्ट्रपक्षाचा दर्जा देण्यांत भारतीय जनतेची विद्याप्रियता, सौंदर्याभिरुचि आणि रसिकता दिसून येते.

गरुड पक्षिराज म्हणून संबोधला जातो, तें त्याच्या लढावू वृत्तिमुळें. पण मयुराचा डौल, विविध रंगछटा, डोक्यावर मुकुटासमान शोभणारा तुरा, सौंदर्य आणि पिसारा गरुडाजवळ नाहीं. फुलविलेला पिसारा हें मोराचें खास आकर्षण! या दृष्टीनें पाहतां मयूर हाच खरा पक्षीराज शोभतो.

राष्ट्रपक्षी म्हणून "मोर" भारतानें मान्य केला आहे. तसेंच राष्ट्रीय पुष्प म्हणून कमलपुष्प आणि राष्ट्रीय पशु म्हणून हत्तीला हा सन्मान मिळालेला आहे.

आस्ट्रेलियाचा राष्ट्रीयपशु कांगारू आहे तर रशियाचें आस्वल आहे. अमेरिकेचा राष्ट्रपक्षी गरूड आहे. प्रत्येक देशाचा निसर्ग आणि कला, सौंदर्याभिरुचि जशी असेल, त्याप्रमाणें हे पशुपक्ष्यादि प्राणी, राष्ट्रीय म्हणून मानण्याची प्रथा आहे. यावरून मानवाचें या प्राण्यांवरील प्रेम व्यक्त होतें.

प्राचीन व अर्वाचीन भारतीय ग्रंथांत मोराबद्दल आदराचे उल्लेख सांपडतात. भारतांत हा विपुलतेनें आढळतो. राजे, सरदार आणि श्रीमंत लोक मोर पक्षी हौसेनें बाळगीत असत. अद्यापहि बाळगतात. प्राणी-संग्रहालयें आणि सार्वजनिक बागा यांत हा पक्षी लोकांना पाहण्यासाठीं मुद्दाम ठेवला जातो.

मोराचे पाय बेढब असतात पण ते तितकेच मजबूत असतात. त्याच्या डोक्यावरील तुऱ्यांत बरोबर २४ पिसें असतात. ही पिसें मधें हिरवीं आणि कडेला पिवळीं असतात. गळा, मान व पोट यांचा रंग निळा असून त्यांवर मधून मधून हिरवट पिवळसर झांक मारते. पूर्ण वाढ झालेल्या म्हणजे वयांत आलेल्या मोराच्या डोक्यावरील तुरा फारच आकर्षक दिसतो.

मोर आनंदांत असतो तेव्हां आपला पिसारा उभारून थुईथुई नाचतो. तें दृश्य मनोहर असतें. मेघगर्जना होते,

तेव्हांहि मोर आनंदानें असेंच नृत्य करतो. या पिसाऱ्यांत साधारणपणें २० पिसें असतात. पिसांवर डोळा असतो व दांडा पांढरा असतो. पिसांच्या कडेला पर असतात. या पिसांवर निळा, हिरवा आणि पिवळा या रंगछटा असतात. जणुंकाय इंद्रधनुष्यच !

शिशिर ऋतुकालांत मोरपिसारा दरवर्षी गळून पडतो व वसंतऋतूंत नवीन पिसारा येतो. पिसारा गळून पडलेल्या अवस्थेंत रानांतील मोर सहसा आढळत नाहीं. या कालांत गर्द वृक्षराजींत मोर विश्रांति घेत पडून राहतो. पिसारा फक्त नरालाच असतो. मोराची मादी लांडोर होय. लांडोर दिसण्यांत कुरूप असते. अशी मादी असणें ही एक निसर्गाची लहर वाटते व अनुरूप मादी न देण्यांत मोरावर अन्याय झाल्यासारखें वाटतें.

मोर मांसाहारी पक्षी आहे. तो सर्पाचा शत्रु आहे. असले विषारी प्राणी मोराच्या आसपासहि फिरकत नाहींत. कृमिकीटक, क्वचित रानफळें व तृणांकूर मोर खातो. माणसाळलेला मोर अन्नधान्यहि खातो. दूधहि पितो.

मादी आपलें घरटें जमिनीवर बांधते. तें गवताचें असतें. जून ते आक्टोबर या कालांत मादी घरट्यांत अंडीं घालते. अंड्यांची संख्या ६ ते १५ पर्यंत असते.

मोराचें नैसर्गिक आयुष्य २० वर्षें असतें. पण पाळीव मोर ११ व ॅ जगतो.

जावा बेटांत हिरवे मोर आढळतात तर सीलोन बेटांतील मोर पांढरे आहेत. सौंदर्यांत भारतीय मोर श्रेष्ठ आहे. भारतीय कविनीं मोराच्या सौंदर्यानें मोहित होऊन त्यावर काव्यरचना केली आहे. त्याचे रंग हा निसर्ग चमत्कार आहे.

मोर उन्हाळ्यांत नेहमी संध्याकाळीं व रात्रीं ओरडतो. पहांटेसही ओरडतो. त्याला 'टाहो' म्हणतात. संस्कृत भाषेंत 'केका' अशी संज्ञा आहे.

आकर्षक रंग, रूप आणि सौंदर्य प्राप्त असलेल्या मयुराला "राष्ट्रपक्षी" मानण्यांत भारतानें आपली गुणग्राहकता प्रकट केली आहे खास! रसिकपणानें मयुराचें योग्य स्थान त्याला बहाल केलें आहे.

—: समाप्त :—

22123
30.1.68

INDIAN INSTITUTE OF ADVANCED STUDY

Acc. No.________________

Author :________________________________

Title : ________________________________

| Borrower | Issued | Returned |
| --- | --- | --- |
| | | |

1. Title of the book : Bharatacha Rastradhawaj and Anya Rastriya Pratike.
2. Price of the Book : Re. 65.
3. Author : B. S. Barve.
4. Publisher : B. S. Barve, Teacher, Cudchade, Goa.
5. Year of Publication : 1965.
6. Number of copies printed : 2,500.
7. Paper used : D/C. White Printing Paper, 26 lbs.
8. Size of type face used 14 Pt. & 16 Pt.
9. Total number of pages in the book : 58.
10. Manufacture of the Paper : Sirpur Paper Mills, Ltd., Sirpur.
11. Type of stitching : Wire Stitching.
12. Name of the Press where the book is printed : Nutan Printing Press, Belgaum.

Library IIAS, Shimla
MR 028.5 B 288 B
00022723